सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे (आपत्ती व्यवस्थापन शाखा)

दुरध्वनी क्र.020-26123371 E-Mail- homebranchpune@gmail.com

वाचा :-१) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005
२) महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951
३) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम 1897
४) फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४
५) पोलीस अधिक्षक पुणे ग्रामिण यांचेकडील पत्र दिनांक २२/३/२०२०
**********************************************************************

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,
जिल्हाधिकारी कार्यालय पुणे,
क्र.जि.आ.व्य/कोरोना विषाणू/ 156 /2020.
पुणे, दिनांक :-22 /03/2020.

जिल्हाधिकारी पुणे

विषय :- कोरोना या विषाणूचा संसर्ग व प्रादूर्भाव रोखण्यासाठी पुणे जिल्हयाच्या ग्रामीण भागात फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१) (३) प्रमाणे मनाई आदेश

**सुधारीत आदेश**

**ज्याअर्थी,** जागतिक आरोग्य संघटनेने कोरोना विषाणूमुळे पसरत असलेला आजार हा साथीचा संसर्गजन्य आजार म्हणून घोषीत केला आहे. तसेच कोरोना विषाणूचा प्रसार भारतात व महाराष्ट्रातील पुणे जिल्हयामध्ये गतीने पसरत आहे असे दिसून येत आहे. तसेच राज्य शासनाने **कोरोना विषाणूचा** (कोवीड-19 ) **प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा** 1897 **हा दिनांक** 13/3/2020 **पासून लागू करुन खंड** 2,3 **व** 4 **मधील तरतुदीनुसार अधिसुचना निर्गमित केली आहे.** भारत सरकार आरोग्य मंत्रालय व महाराष्ट्र सरकार आरोग्य मंत्रालय यांनी जाहिर केलेप्रमाणे कोरोनाग्रस्त रुग्णाच्या संर्पकात लोकांनी येऊ नये. तसेच सार्वजनिक किंवा खाजगी जागेत पाच किंवा पाच पेक्षा अधीक व्यक्तींनी एकत्र येणे थांबणे , चर्चा करणे काही कार्यक्रमाचे आयोजन केल्यास कोरोना विषाणूचा संसर्ग व प्रार्दुभाव पसरण्याची शक्यता लक्षात घेता सर्व सामान्य जनतेस व त्यांचे आरोग्यास धोका निर्माण होत असल्याचे माझी खात्री झालेली आहे. त्या करीता तात्काळ प्रतिबंधक उपाय योजना करणे आवश्यक आहे. अशा प्रतिबंधात्मक उपाययोजना फौजदारी दंड प्रक्रिया सहिंता कलम १४४ खालील तरतुदीच्या अनुषंगाने जनतेस, खालील नमूद व्यक्ती व आस्थापना व यांना उददेशुन काढणे आवश्यक असलेबाबत माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी, मी नवल किशोर राम, जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हाधीकारी, पुणे फौजदारी दंड प्रक्रीया संहीता 1973 चे कलम 144 (1) (3) अन्वये कोणत्याही व्यक्तीला पुणे जिल्हयाच्या ग्रामीण भागात कोणत्याही रस्त्यावर, सार्वजनिक वाहतुकीने रस्त्यावर, गल्लोगल्ली इ. ठिकाणी संचार, वाहतूक, फिरणे, उभे राहणे, थांबून राहणे, रेंगाळणे या सर्व कृत्य मनाइ करणारा आदेश दिनांक **२३/०३/२०२० चे ०५.०१** ते दिनांक **३१/०३/२०२० चे २४.००** दरम्यान लागू करीत आहे.

1) पुणे जिल्हयाच्या ग्रामीण भागात खाजगी व सार्वजनिक ठिकाणी पाच किंवा पाच पेक्षा अधिक व्यक्ती एकत्र येतील अशा सर्व प्रकारचे कृत्ये जसे कार्यशाळा, सर्व प्रकारचे समारंभ, सांस्कृतिक व धार्मिक कार्यक्रम, सण, उत्सव, ऊरुस, जत्रा, मनोरंजनाचे कार्यक्रम, क्रिडा व इतर स्पर्धा, कॅम्प, प्रशिक्षण वर्ग, अत्यावश्यक विष्याखेरीज सर्व प्रकारचे बैठका, मिरवणुका, मेळावे, सभा, आंदोलने, पुणे दर्शन सहल, देशांतर्गत व परदेशी सहली इ. यांचे आयोजन करणेसाठी मनाई राहील.

Scanned by CamScanner

2) पुणे जिल्हयाच्या ग्रामीण भागात सर्व खाजगी, कॉर्पोरेट, दुकाने व सेवा आस्थापना संपूर्णत: उपहारगृहे/खाद्यगृहे, खानावळ, शॉपिंग कॉम्प्लेक्स, मॉल्स, सुपर मार्केट, मनोरंजनाचे ठिकाणे, सर्व क्लब, क्रिडांगणे, मैदाने, पब, लाईव्ह ऑर्केस्ट्रा, जलतरण तलाव, उद्याने, सिनेमागृहे, व्यायाम शाळा, नाट्यगृहे, कला केंद्र, म्युझियम, प्रेक्षागार, व्हीडीओ पार्लर, ऑनलाईन लॉटरी सेंटर, पान टपरी, बिअरबार, परमीट रुम, शाळा, महाविद्यालये, खाजगी शिकवणी वर्ग, प्रशिक्षण केंद्र, सार्वजनिक बस व रेल्वे सेवा , खाजगी वाहन वाहतुक, इत्यादी बंद राहतील.

3) आयसोलेशन सेंटर, कॉरनटाईन सेंटर, परिसरातील वाहनांची ये-जा मर्यादित राहील.

४) सर्व नागरिकांना अनावश्यकरित्या सार्वजनिक ठिकाणी विहित कारणाशिवाय येणेस मनाई राहील.

५) उपरोक्त नमुद कारणा व्यतिरिक्त अन्य कोणत्याही कारणास्तव ५ किंवा ५ पेक्षा जास्त व्यक्तीना सार्वजनिक / खाजगी ठिकाणी एकत्र येण्यास मनाई आहे.

**६) सदरचे आदेश खालील बाबतीत लागू राहणार नाहीत**

१. शासकिय व निमशासकिय कार्यालये, सरकारी महामंडळाचे उपक्रम / आस्थापना, पोस्ट ऑफिस.

२. अत्यावश्यक सेवेतील सर्व अधिकारी / कर्मचारी (केंद्र सरकार व राज्य सरकार ) त्यांचे नियुक्ती आदेश किंवा ओळखपत्र जवळ बाळगणे बंधनकारक राहील.

३. अत्यावश्यक सेवा रुग्णालये, पॅथोलॉजी लॅबरॉटरी, सर्व औषधे उत्पादक व विक्री आस्थापना, आरोग्य विषयक साहित्य निर्मिती केंद्र

४. फळे व भाजीपाला मार्केट, फळे व भाजीपाला विक्री दुकाने

५. जीवनावश्यक वस्तु विक्री आस्थापना ,दुध व किराणा दुकाने

६. सर्व हॉटेल व लॉज यांना तेथे वास्तव्यास असणा-या ग्राहकांना आरोग्य विषयक आवश्यक ती खबरदारी घेऊन रेस्टारंटमध्ये खादय पदार्थ बनवून देण्यास परवानगी राहील.

७. सर्व हॉटेल व सर्व व्यवसायीक यांनी खादय पदार्थ ऑन लाईन पध्दतीने विक्री करणा-या आस्थपनाच्या मागणीनुसार पार्सल स्वरुपात कांऊटरवरुन वितरीत करणेत यावे.

८.सर्व हॉटेल व सर्व व्यवसायीक यांनी दुरध्वनी व भ्रमणध्वनी नागरीकांनी खाद्य पदार्थ मागणीबाबत संपर्क केलेनंतर खादयपदार्थ होम डिलीव्हरी पार्सल स्वरुपात वितरीत करण्यात यावे.

९.विदयार्थीसाठी खानावळ तसेच महाविदयालय/ वस्तीगृह यामधील कॅन्टीन /मेस

१०.अत्यावश्यक सेवेतील अधिकारी / कर्मचारी (केंद्र सरकार व राज्य सरकार ) यांच्याकरीता वाहतुक सेवा (बस, रेल्वे व अत्यावश्यक सेवेतील वाहने यांना वाहनांवर अत्यावश्यक सेवेचे फलक लावणे बंधनकारक राहील).

११. सर्व प्रकारचे वैद्यकिय कॉलेज ( अॅलोपॅथी, आयुर्वेदिक, होमिओपॅथिक इत्यादी), नर्सिग कॉलेज.

१२.अंत्यविधी व लग्न समारंभ (या ठिकाणी गर्दी होवू नये याची दक्षता घ्यावी).

१३.आरबीआय व बँकिंग सेवा, ए.टी.एम. सेवा, विमा कंपनी कार्यालय, ऑनलाईन पध्दतीने घरपोच वस्तुसेवा (अॅमेझॉन, फिल्प कार्ट, बिग बास्केट इ.)

१४. दुरध्वनी व इंटरनेट सेवा पुरवणारे

१५. पिण्याचा पाणी पुरवठा, वीज पुरवठा, पेट्रोलियम, ऑईल, ऊर्जा पुरवठा.

१६. मिडिया (सर्व प्रकारचे प्रसार माध्यम कार्यालय), वेअर हाऊसेस.

१७. जीवनावश्यक सेवांना उपयोगी असणाऱ्या आयटी सेवा.

१८. सार्वजनिक कचरा व्यवस्थापन व स्वच्छता पुरवणाऱ्या सेवा.

१९ सद्यस्थितीत सुरु असणारे सार्वजनिक इंन्फ्रास्ट्रक्चर प्रोजेक्ट्स ज्यामध्ये रस्ते, पाणी वाहतूक व्यवस्था व सांडपाणी व्यवस्थापन यांचा समावेश आहे.

२० जीवनावश्यक वस्तु जसे, अन्न, मेडिसिन्स, पेस्ट कंट्रोल व औषधी संसाधने यांचे उत्पादन, वाहतूक, पुरवठा व ई-कॉमर्स इत्यादी.

२१ रेल्वे स्टेशन, एस.टी.स्टँड, महानगर परिवहन थांबे व स्थानके, विमानतळ, रिक्षा थांबे, पेट्रोल पंप व सी.एन.जी गॅस पंप.

२२ अत्यावश्यक सेवा व वाहतूक यांची व्यवस्था.

Scanned by CamScanner

२३ राज्य शासन व केंद्र शासनाकडून घेण्यात येणाऱ्या सर्व स्पर्धा परिक्षा, विद्यापीठ / विश्व विद्यालय परिक्षा

पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण यांनी वर नमुद केलेल्या बाबी सबंधी वाहतुक वगळता इतर सर्व प्रकारच्या वाहनास प्रतिबंध करावा त्याचप्रमाणे पोलीस अधीक्षक यांनी वैद्यकीय सेवा सुविधा प्रशासकीय सेवा जीवनावश्यक वस्तु, खरेदीसाठी वैयक्तिक व्यक्तीने कमीत कमी अतंरासाठी केलेली वाहतुक यांना सुट देऊन इतर सर्व कारणा व्यतिरीक्त केलेली वाहतुक प्रतिबंधीत करावी.

तसेच पोलीस अधीक्षक यांनी पुर्ण जिल्हयात विनाकारण/ अनावश्यक वावरणाऱ्या व्यक्तींवर योग्य तो पोलीस बंदोबस्त नेमणुक करुन नियंत्रण ठेवावे

जिल्हयातील जीवनावश्यक वस्तुंची अवैध साठेबाजी व काळबाजार होणारा नाही याची दक्षता पोलीस विभाग, पुरवठा विभाग, अन्न व औषध प्रशासन विभाग, वैधमापन शास्त्र विभाग यांनी घ्यावी

या आदेशाची पोलीस विभागाने त्यांचे वाहनावरील ध्वनीक्षेपका मार्फत व्यापक प्रसिध्दी करावी व या आदेशाचे काटेकोर पणे पालन करण्याची दक्षता घ्यावी.

**टिप:-** 1. वरील नमूद सर्व संबधीत अधिकारी, कर्मचारी, परिक्षार्थी/ विदयार्थी, शिक्षक यांनी त्यांचे नेमणुकीचे आदेश परिक्षेसाठीचे प्रवेशपत्र, ओळखपत्र सोबत बाळगणे बंधनकारक आहे.

2. वरील नमूद ठिकाणी कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव व प्रसार टाळणेसाठी आवश्यक त्या सर्व प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवणेची दक्षता संबधित कार्यालय दुकान /आस्थापना यांच्या चालक/मालक कार्यालयीन प्रमुख तसेच व्यवस्थापक यांनी घ्यावी.

3. पुणे जिल्हयातील उद्योग आस्थापनांच्या बाबतीत स्वतंत्र आदेश निर्गमित करणेत येतील.

**सदर आदेशाचे उल्लंघन केल्यास आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 व भारतीय दंड विधान 1860 कायदयाचे कलम 188 प्रमाणे सर्व संबंधित दंडनीय कारवाईस पात्र राहतील.**

सदर आदेश माझ्या सही शिक्क्यानिशी दिनांक 22/3/2020 रोजी दिलेला आहे.

जिल्हाधिकारी पुणे

(नवल किशोर राम)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे**

**प्रति,**

1. **मा.विभागीय आयुक्त पुणे यांना माहितीस्तव**
2. **मा.आयुक्त पुणे महानगरपालिका / पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
3. **मा.पोलीस आयुक्त पुणे शहर / पिंपरी चिंचवड यांना माहितीस्तव**
4. **पोलीस अधिक्षक पुणे ग्रामीण यांचेकडे माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रषित**
5. **व्यवस्थापक मुद्रणांलय येरवडा जेल यांनी राजपत्र प्रसिध्द करुन 10 प्रतीत या कार्यालयाकडे पाठवाव्यात**
6. **जिल्हा माहिती अधिकारी पुणे व्यापक प्रसिध्दीसाठी**
7. **सर्व उप विभागीय अधिकारी/ तहसिलदार यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी**
8. **मंत्रायलीन नियत्रण कक्ष महाराष्ट्र राज्य मुंबई यांजकडे माहितीस्तव**
9. **जिल्हा पुरवठा अधिकारी,/ अन्न धान्य वितरण अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय पुणे आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रषित**
10. **सहाय्यक आयुक्त अन्न व औषध प्रशासन पुणे आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रषित**
11. **उपनियंत्रक वैधमापन शास्त्र पुणे विभाग पुणे आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रषित**

Scanned by CamScanner